# ॥ श्रीनिवृत्तिमहाराजकृत हरिपाठाचे अभंग ॥

१

हरिविण दैवत नाहीं पैं अनुचित्तीं ।अखंड श्रीपती नाम वाचे ॥१॥
रामकृष्ण मूर्ति या जपा आवृत्ती ।नित्य नामें तृप्ती जाली आम्हां ॥२॥
नामाचेनि स्मरणें नित्य पैं सुखांत ।दुजीयाची मात नेणो आम्ही ॥३॥
निवृत्ति जपतु अखंड नामावळी ।हृदयकमळीं केशीराज ॥४॥

२

हरिविण चित्तीं न धरीं विपरीत ।तरताती पतित रामनामें ॥१॥
विचारुनी पाहा ग्रंथ हे अवघे ।जेथें तेथें सांग रामनाम ॥२॥
व्यासादिक भले रामनामापाठीं ।नित्यता वैकुंठीं तयां घर ॥३॥
शुकादिक मुनि विरक्त संसारीं ।रामनाम निर्धारीं उच्चारिलें ॥४॥
चोरटा वाल्मीकि रामनामीं रत ।तोही एक तरत रामनामीं ॥५॥
निवृत्ति साचार रामनामी दृढ ।अवघेचि गूढ उगविले ॥६॥

३

हरिमार्ग सार येणेंचि तरिजे ।येरवीं उभिजे संसार रथ ॥१॥
जपतां श्रीहरी मोक्ष नांदे नित्य ।तरेल पैं सत्य हरि नामें ॥२॥
काय हें ओखद नामनामामृत ।हरिनामें तृप्त करी राया ॥३॥
निवृत्ति साचार हरिनाम जपत ।नित्य हृदयांत हरी हरी ॥४॥

४

एकेविण दुजें नाहीं पैं ये सृष्टी ।हें ध्यान किरीटी दिधलें हरी ॥१॥
नित्य या श्रीहरि जनीं पैं भरला ।द्वैताचा अबोला तया घरीं ॥२॥
हरीविणें देवो नाहीं नाहीं जनीं ।अखंड पर्वणी हरी जपतां ॥३॥
निवृत्ति साकार हरिनाम पाठ ।नित्यता वैकुंठ हरिपाठ ॥४॥

५

जपतां कुंटिणी उतरे विमान ।नाम नारायण आलें मुखा ॥१॥
नारायण नाम तारक तें आम्हां ।नेणों पैं महिमा अन्य तत्त्वीं ॥२॥
तरिले पतित नारायण नामें ।उद्धरिले प्रेमें हरिभक्त ॥३॥
निवृत्ति उच्चार नारायण नाम ।दिननिशी प्रेम हरी हरी ॥४॥

६

एक तत्त्व हरि असे पैं सर्वत्र ।ऐसें सर्वत्र शास्त्र बोलियलें ॥१॥
हरिनामें उद्धरे हरिनामें उद्धरें ।वेगीं हरि त्वरें उच्चारी जो ॥२॥
जपता पैं नाम यमकाळ कांपे । हरी हरी सोपें जपिजे सुखें ॥३॥
निवृत्ति म्हणे हरिनामपाठ जपा ।जन्मांतर खेपा अंतरती ॥४॥

७

गगनींचा घन जातो पैं वारेन । अवचिता पतन अधोपंथें ॥ १॥
अध ऊर्ध्व हरि भाविला दुसरी । प्रपंचबोहरी आपोआप ॥ २॥
निवृत्ति म्हणे जन हरीचें स्वरूप । कळाचें पैं माप हरिनाम ॥ ३॥

८

सृष्टीच्या संमता सुरतरु तरु । बोलिला विस्तारु धर्मशास्त्रीं ॥ १॥
नेघों हें तरु प्रपंचपरिवारु । प्रत्यक्ष ईश्वरू पुरे आम्हा ॥ २॥
निवृत्ति निवांत हरीच सेवित । दो अक्षरीं उचित इंद्रिया ॥ ३॥

९

सर्वांभूतीं दया शांती पैं निर्धार । योग साचार जनीं इये ॥ १॥
न लगे मुंडण काया हें दंडणें । अखंड कीर्तन स्मरे हरी ॥ २॥
शिव जाणें जीवीं रक्षला चैतन्य । हे जीवीं कारुण्य सदा भावीं ॥ ३॥
गगनीं सूर्य तपे अनंत तारा लोपे । एकची स्वरूपें आत्मा तैसा ॥ ४॥
उगवला कळीं उल्हासु कमळीं । तैसा तो मंडली चंद्र लेखा ॥ ५॥
निवृत्तिमंडळ अमृत सकळ । घेतलें रसाळ हरिनाम ॥ ६॥

१०

जयाचेनि सुखें चळत पैं विश्व । नांदे जगदीश सर्वा घटीं ॥ १॥
त्याचें नाम हरी त्याचें नाम हरी । प्रपंचबोहरी कल्पनेची ॥ २॥
शांति त्याची नारी प्रकृति विकारी । उन्मनी बोवरी हृदयांतु ॥ ३॥
निवृत्तिदेवीं साधिली राणीव । हरपले भाव इंद्रियांचे ॥ ४॥

११

हरीविण भावो वायांचि संदेहो । हरि देवो देवो आहे सत्य ॥ १॥
हरी हरी वाचे ऐसें जपा साचें । नाहीं त्या यमाचे मोहजाळ ॥ २॥
हरीविण सार नाहीं पैं निर्धार । हरिविण पार न पाविजे ॥ ३॥
निवृत्ति श्रीहरि चिंती निरंतरीं । हरि एक अंतरीं सर्वीं नांदे ॥ ४॥

१२

ध्यान धरा हरी विश्रांति नामाची । विठ्ठलींच साची मनोवृत्ति ॥ १॥
ध्यानेविण मन विश्रांतिविण स्थान । सूर्याविण गगन शून्य दिसे ॥ २॥
नलगे साकार विठ्ठल मनोवृत्ति । प्रपंच समाप्ति ती अक्षरीं ॥ ३॥
निवृत्ति समता विठ्ठल कीर्तन । करितां अनुदीन मन मेळे ॥ ४॥

१३

प्रपंचाची वस्ती व्यर्थ काया काज । आम्हां बोलता लाज येत सये ॥ १॥
काय करूं हरी कैसां हा गवसे । चंद्रसूर्य अंवसे एकसूत्र ॥ २॥
तैसें करूं मन निरंतर ध्यान । उन्मनी साधन आम्हां पुरे ॥ ३॥
निवृत्ति हरिपाठ नाम हेंचि वाट । प्रपंच फुकट दिसे आम्हां ॥ ४॥

१४

लटिका संसार वाढविसी व्यर्थ । विषयाचा स्वार्थ क्षणें करीं ॥ १॥
नको शिणों दुःखे का भरिसी शोकें । एकतत्त्वें एकें मन लावीं ॥ २॥
लावीं उन्मनीं टाळी टाळिसी नेई बाळी । अखंड वनमाळी हृदयवटी ॥ ३॥
निवृत्ति चपळ राहिला अचळ । नाहीं काळ वेळ भजतां हरी ॥ ४॥

१५

कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैसेनि जवळीं देव होय ॥ १॥
टाकी हे कल्पना दुरित वासना । अद्वैत नारायणा भजें कां रे ॥ २॥
मोहाच्या जीवनीं नको करूं पर्वणी । चिंती कां आसनीं नारायण ॥ ३॥
निवृत्ति अवसरु कृष्णनाम पैं सारु । कल्पना साचारु हरी झाला ॥ ४॥

१६

मोहाचेनि देठें मोहपाश गिळी । कैसेनि गोपाळीं सरता होय ॥ १॥
मोहाचेनि मोहनें चिंतितां श्रीहरी । वाहिजु भीतरीं अवघा होय ॥ २॥
दिननिशीं नाम जपतां श्रीहरीचें । मग या मोहाचें मोहन नाहीं ॥ ३॥
निवृत्ति आगम मोहन साधन । सर्व नारायण एका तत्त्वें ॥ ४॥

१७

तिमिरपडळें प्रपंच हा भासे । झाकोळला दिसे आत्मनाथ ॥ १॥
हरीविण दुजें चिंतितां निभ्रांत । अवघेंचि दिसत माया भ्रम ॥ २॥
सांडूनि तिमिर सर्व नारायण । हेंचि पारायण नित्य करी ॥ ३॥
निवृत्ति सज्जन अवघा आत्मराज । एकतत्त्व बीज नाम लाहो ॥ ४॥

१८

प्रवृत्ति निवृत्ति या दोन्ही जनीं । वनीं काज करुनी असती ॥ १॥
नारायण नाम जपतांचि दोन्ही । एकतत्त्वीं करणी सांगिजे गुज ॥ २॥
आशेचे विलास गुंफोनिया महिमा । सत्त्वीं तत्त्व सीमा निजज्ञाने ॥ ३॥
निवृत्ति तत्त्वतां मनाचे मोहन । नित्य समाधानें रामनामें ॥ ४॥

१९

क्षेत्राचा विस्तार क्षेत्रज्ञवृत्ति । अवघी हे क्षिती एकरूपें ॥ १॥
शांति दया पैसे क्षमा जया रूप । अवघेची स्वरूप आत्माराम ॥ २॥
निंदा द्वेष चेष्टा अभिमान भाजा । सांडूनियां भजा केशवासी ॥ ३॥
निवृत्ति तिष्ठतु एकरूप चित्त । अवघींच समस्त गिळियेलीं ॥ ४॥

२०

आम्ही चकोर हरि चंद्रमा । आम्ही कळा तो पौर्णिमा ॥ १॥
कैसा बाहिजु भीतरी हरी । बिंब बिंबला एक सूत्रीं ॥ २॥
आम्ही देही तो आत्मा । आम्ही विदेही तो परमात्मा ॥ ३॥
ऐक्यपणें सकळ वसे । द्वैतबुद्धी कांहीं न दिसे ॥ ४॥
निवृत्ति चातक इच्छिताहे । हरिलागीं बरें तें पाहे ॥ ५॥

२१

ज्याचे मुखीं नाम अमृतसरिता । तोचि एक पुरता घटु जाणा ॥ १॥
नामचेनि बळे कळिकाळ आपणा । ब्रह्मांडा येसणा तोचि होय ॥ २॥
न पाहे तयाकडे काळ अवचिता । नामाची सरिता जया मुखीं ॥ ३॥
निवृत्ति नामामृत उच्चारी रामनामे । नित्य परब्रह्म त्याचे घरीं ॥ ४॥

२२

नित्य नाम वाचे तोचि एक धन्य । त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं ॥ १॥
रामनामकीर्ति नित्य मंत्र वाचे । दहन पापाचें एका नामें ॥ २॥
ऐसा तो नित्यता पुढे तत्त्व नाम । नाहीं तयासम दुजें कोणी ॥ ३॥
निवृत्ति अव्यक्त रामनाम जपे । नित्यता पैं सोपें रामनाम ॥ ४॥

२३

अखंड जपतां रामनाम वाचे । त्याहूनी दैवाचे कोण भूमी ॥ १॥
अमृतीं राहिले कैचें मरण । नित्यता शरण हरिचरणा ॥ २॥
साममंत्र रासी अनंत पुण्य त्यासी । नाहीं पैं भाग्यासी पार त्याच्या ॥ ३॥
निवृत्ति म्हणे सार रामनाम मंत्र । कैंचा त्यासी शत्रु जिती जनीं ॥ ४॥

२४

नाम नाहीं वाचे तो नर निर्दैव । कैसेनि देव पावेल तया ॥ १॥
जपे नाम वाचें रामनाम पाठें । जाशील वैकुंठे हरी म्हणता ॥ २॥
न पाहे पैं दृष्टीं कळिकाळ तुज । रामनाम बीज मंत्रसार ॥ ३॥
निवृत्ति म्हणे नाम जपावें नित्यता । आपणचि तत्त्वतां होईल हरी ॥ ४॥

२५

नामाचेनि बळें तारिजे संसार । आणिक विचार करूं नको ॥ १॥
नाम जप वेगीं म्हणे हरी हरी । प्रपंच बोहरी आपोआप ॥ २॥
नित्यता भजन देवद्विज करी । नाम हे उच्चारि रामराम ॥ ३॥
निवृत्ति जपतु राम राम वाचे । दहन पापाचें आपोआप ॥ ४॥

॥ इति श्रीनिवृत्तिनाथ हरिपाठ समाप्त ॥

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999